## श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## <u>जाहीर दरपत्रक</u>

दि.१८/०४/२०२२

**विषय :–** एलईडी लाईटचे तयार फोटोचे दरपत्रक पाठविणे बाबत.....

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे नवीन स्वरूपातील श्री.विठ्ठल रुक्मिणी मातेचे विविध स्वरूपातील चित्रांचे एलईडी लाईट फोटो भाविकांना उपलब्ध करणे कामी आवश्यक असणारे एलईडी लाईटचे तयार फोटोची खरेदी करणे कामी दरपत्रके मागवित आहोत. सदरच्या करावयाच्या पुरवठा करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी मंदिर समितीकडील विहीत नमुन्यातील अर्ज सही व शिक्क्यासह दरपत्रक दि.२५/०४/२०२२ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाकडे सिलबंद लिफाप्यात सादर करावे. सिलबंद पाकीटावर खालील तपशिल नमुद करावा.

'' एलईडी लाईटचे तयार फोटो पुरवठा कामाचे दरपत्रक''

पुरवठाधारकाचे पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक

उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. सोबत दरपत्रक माहिती, अटी व शर्तीची प्रत जोडली आहे.

स्वा/–
**व्यवस्थापक,**
**श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

# अटी व शर्ती

१.मंजुर दराने पुरवठादराने मंदिर समितीच्या मागणीप्रमाणे एल.ई.डी. लाईट फोटो पुरवठा करणे आवश्यक आहे.

२. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या प्रमाणात फ्रेमचा पुरवठा करणे आहे.

३. एल.ई.डी. लाईट फोटो चांगल्या गुणवत्तेचे असणे आवश्यक आहे.

४. पुरवठा करण्यात येणाऱ्या एल.ई.डी. लाईट फोटो दर्शन मंडप यथे जागेवर पोहोच करण्याचे आपणास बंधनकारक राहिल.

५.सदर एल.ई.डी. लाईट फोटो मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस आपणास जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

६. सदर एल.ई.डी. लाईट फोटो खराब असल्याचे आढळून आलेस आपणास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

७.पुरवठा करण्यात आलेल्या एल.ई.डी. लाईट फोटो ची प्रत व प्रमाण संबधीत विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

८. सदर एल.ई.डी. लाईट फोटो पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च आपणास दिला जाणार नाही.

९.सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१०.एल.ई.डी. लाईट फोटो पुरवठा वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील. तसेच वाहतुकी मध्ये फोटो खराब झालेस त्यासाठी मंदिर समिती जबाबदार राहणार नाही.

११.समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते आपणास बंधनकारक राहील.

१२.सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१३.दरपत्रक मंजूरी आदेशापासून १ वर्ष कालावधीसाठी मंजूर दराने मंदिराच्या मागणी प्रमाणे पुरवठा करणेस बंधनकारक राहील.

१४.वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस आपणास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

१५. एल.ई.डी. लाईट फोटो व लाईटला गॅरटी/वारंटी तसेच त्याची वैधता २ वर्षाची असणे आवश्यक आहे.

१६. फोटो वैधता कालावधी मध्ये खराब झालेले फोटो १५ दिवसात बदलुन देणे गरजेचे आहे.

१७. खराब झालेले फोटोची वाहतुक व अतिरिक्त कोणताही खर्च अदा केला जाणार नाही.

१८. सदर फोटो प्रति नगानुसार उत्तम प्रकारचे पॅकींगसह देणे बंधनकारक आहे.

१९.प्रशासकीय व अन्य कारणास्तव मंजुर दरपत्रक कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अथवा कामामध्ये बदल करणेचा अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी राखुन ठेवलेला आहे.

२०.आपण रू.५००/—चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र करूण देणे आवश्यक आहे.सदरचे प्रतिज्ञापत्र या कार्यालयाकडे जमा केल्याशिवाय पुरवठा कामाची बिले अदा केली जाणार नाहीत.

स्वा/—
कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर,जि.सोलापूर

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## जाहिर दरपत्रक.

प्रति,

मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषयः– एलईडी लाईटचे तयार फोटो एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ गरजेनुसार पुरवठा करणे कामी निविदा.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :– श्री.––––––––––––––––––––––––––––––––
पूर्ण पत्ता :– ––––––––––––––––––––––––––––––––
––––––––––––––––––––––––––––––––

मोबाईल कं.:– ––––––––––––––––––––––––––––––––

महोदय,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे एलईडी लाईटचे तयार फोटो एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ गरजेनुसार पुरवठा करणे कामाची दि.१८/०४/२०२२ रोजीचे मंदिराचे श्री संत तुकाराम भवन येथील नोटीस बोर्डावरती सुचना / जाहीरात प्रसिध्द झालेल्या जाहीर दरपत्रकाप्रमाणे सेंथेटीक फ्रेम दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र. | पुरवठा करणे साहीत्याचे प्रकार | कालावधी | प्रमाण | दर रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | १३x१९एल.ई.डी फोटो फ्रेम | एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ | प्रति नग | |
| २ | १८x२४एल.ई.डी फोटो फ्रेम | | प्रति नग | |
| ३ | २४x३६एल.ई.डी फोटो फ्रेम | | प्रति नग | |
| ४ | ३६ x ४८एल.ई.डी फोटो फ्रेम | | प्रति नग | |
| ५ | ९x१२एल.ई.डी फोटो फ्रेम | | प्रति नग | |
| ६ | ६x८एल.ई.डी फोटो फ्रेम | | प्रति नग | |

वरील दर प्रत्यक्ष साईज व कंपनीप्रमाणे एलईडी लाईटचे तयार फोटो सर्व वाहतुक खर्चा सहीत एक वर्षासाठी पुरवठा करणे कामी तसेच सर्व प्रकारचे करासहीत दर आकारण्यात आले आहेत. तसेच सदर दराने एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ पर्यंत करणे त्वरीत पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे एलईडी लाईटचे तयार फोटो पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक / /२०२२ सही व शिक्का

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. शॉप ॲक्ट लायसन्स / नोंदणी परवाना.
२. पॅन कार्ड.
३. जीएसटी प्रमाणपत्र अन्यथा कर आकरणी उत्पन प्रमाणपत्र ( इनकमटॅक्स प्रमाणपत्र )